स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक 28—12—2012 रोजी दुपारी 12—30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 3. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 4. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 5. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 6. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 7. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 8. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |
| 9. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 10. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 2. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 6. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अति. आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 239</u> :— नागपूर महानगरपालिकेचे सन 2011—12 चे वार्षिक लेखे स्थायी समिती समोर माहिती करिता ठेवण्याचा मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 240</u> :— प्रभाग क्र. 50 येथील पटेल चौक ते महावीर किराण स्टोअर्स पर्यन्त रस्त्याच्या रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. 89,69,430/— च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच निविदा काढण्याचे परवानगीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 241</u> :— प्रभाग क्र. 50 येथील टिंबर मार्केट एरियामध्ये रस्त्याच्या रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. 77,75,125/— च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच निविदा काढण्याचे परवानगीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 242</u> :— प्रभाग क्र.66 'अ' येथील रामेश्वरी चौक ते भगवान नगर चौका पर्यन्त रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणच्या कामास्तव रु. 26,99,551/— च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच निविदा काढण्याचे परवानगीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 243</u> :— नागपूर शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याकरीता नागरीक, दुकानदार, व्यवसायी, पान ठेले इत्यांदीनी रस्त्यावर किंवा बाहेर कुठेही कचरा, टाकाऊ बांधकाम साहित्य वगैरे टाकु नये व परिसरात स्वच्छता ठेवण्याच्या दृष्टीने नविन 72 प्रभाकरिता एकूण 72 नागरी पोलिस व त्यावर नियंत्रण ठेवण्याकरीता 11 सुपरवायझर यांना अनुक्रमे त्यांनी वसुली केलेल्या रक्कमे मधुन 50% प्रमाणे वेतन देण्यासाठी 12 महीण्यांकरीता कंत्राटी पध्दतीवर लावण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन किमान वेतन धोरणाप्रमाणे मासिक वेतनाची मर्यादा निश्चित करण्यात यावी वेतनापेक्षा प्रती महा दुप्पट वसुली करणे बंधनकारक राहील या शिवाय ज्या कर्मचाऱ्यांनी दुप्पट पेक्षा जास्त वसुली करेल त्यास उच्चतम मर्यादा निश्चित करुन प्रोत्साहन पर राशी देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 244** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर

z z z z z z z z